राज्य योजनेंतर्गत सन २०१८-१९ शासकीय अभिकरणाकडून समुपयोजनासाठी (जळाऊ लाकूड व दगडी कोळसा) (२४०६ ०४८१) या योजनेकरीता अनुदान वितरीत करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्र.संकिर्ण-२०१९/प्र.क्र.७५/फ-९
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- २९ मार्च, २०१९

वाचा :-

१. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक ०२ एप्रिल, २०१८
२. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१९६/फ-९, दिनांक १४.०६.२०१८
३. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३६३/फ-९, दिनांक ०६.१०.२०१८
४. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०१८/प्र.क्र.३६४/फ-९, दिनांक ०६.१०.२०१८
५. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०१८/प्र.क्र.४२७/फ-९, दिनांक १३.११.२०१८
६. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दिनांक २५ जानेवारी, २०१९
७. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१९/प्र.क्र.१/२०१९/कोषा प्रशा-५, दि. ३१.०१.२०१९
८. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.४२/अर्थ-३, दिनांक ०८ मार्च, २०१९
९. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०१९/प्र.क्र.७५/फ-९, दिनांक १३.०३.२०१९
१०. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०१९/प्र.क्र.७५/फ-९, दिनांक २२.०३.२०१९
११. महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक:संकीर्ण-२०१९/प्र.क्र.७५/फ-९, दिनांक २७.०३.२०१९
१२. प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष १/पी/यो/चाबाप्र/प्र.क्र.२४/२५११/२०१८-१९, दिनांक २९.०३.२०१९
१३. मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे यांचे पत्र क्र.कक्ष-२(१)/योजना/प्र.क्र.१७३/९१/२०१८-१९, दि.२९.३.२०१९ व क्र.कक्ष-२(१)/योजना/प्र.क्र.१७३/९५/२०१८-१९, दिनांक २९.३.२०१९

प्रस्तावना :-

राज्य योजना सन २०१८-१९ पासून शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन (जळाऊ लाकूड व दगडी कोळसा) (२४०६ ०४८१) या योजनेकरिता रुपये ७००.०० लक्ष नियतव्यय मंजुर व अर्थसंकल्पित आहे. तसेच आठमाही सुधारीत अंदाजानुसार रु.६९१.९७ लक्ष नियतव्यय मंजूर करण्यात आलेला आहे. वित्त विभागाच्या दिनांक ०८ मार्च, २०१९ रोजीच्या परिपत्रकान्वये सन २०१८-१९ करिता निधी वितरण /पुनर्विनियोजन प्रस्तावाच्या अनुषंगाने निधीचे वितरण करण्यात यावे, असे आदेश आहेत. सदर निधी वितरित करतांना दिनांक ०२.०४.२०१८ च्या परिशिष्टातील अटीची पूर्तता व दिनांक २५.०१.२०१९ मधील सूचनांचे पालन करण्याचे कळविले आहे. सदर योजनेंतर्गत आतापर्यंत संदर्भ क्र.२,३,४,५,९,१० व ११ येथील शासन निर्णयान्वये रु.६३६.५४ लक्ष इतक्या निधीस शासन मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. आता वित्त विभागाच्या सुधारीत अंदाजाच्या मर्यादेत ५५.४३ लक्ष इतका निधी वितरीत करण्यासाठी शिल्लक आहे.

सदर योजनेअंतर्गत अर्थसंकल्पित असलेल्या नियतव्ययाच्या अनुषंगाने मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे वनवृत्तातील भांबुर्डा वनपरिक्षेत्रातील कोथरुड सं.नं.१०२, भांबुर्डा- पाषाण, पाचगावपर्वती व पौड वनपरिक्षेत्रातील बावधन फॉ.स.नं.३ व पुणे वनक्षेत्रातील वानवडी व कात्रण व वडगांव परिक्षेत्रातील तळेगांव येथे ग्लिरिसिडीया मुळासकट काढणे व त्याची विल्हेवाट लावणे या करीता **एकूण रु.५५.४२** लक्षचा नवीन बाब प्रस्ताव विवरण

पत्रासह संदर्भ क्र.१२ अन्वये प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यानी शासन मंजूरी प्रदान करुन अनुदान उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे. त्यानुसार या कामासाठी अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

<u>शासन निर्णय:-</u>

प्रधान मुख्य वनसरंक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यानी संदर्भ क्र.१२ नुसार सादर केलेला प्रस्ताव व वित्त विभागाच्या संदर्भ क्र.१,६,७ व ८ येथील परिपत्रकान्वये दिलेल्या सूचना विचारात घेता प्रस्तावातंर्गत मागणी लक्षात घेऊन, वार्षिक योजना सन २०१८-१९ मध्ये शासकीय अभिकरणाकडून समुपयोजन (जळाऊ लाकूड व दगडी कोळसा) (२४०६-०४८१) या योजनेमधून सन २०१८-१९ करीता मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे या वनवृत्तातील खालील तक्त्यात दर्शविण्यात आलेल्या बाब निहाय कामांसाठी सन २०१८-१९ करीता **रु.५५.४२ लक्ष** इतका निधी वितरीत करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे:-

अ.क्र.	**वनवृत्त**	**वनपरिक्षेत्र व गावाचे नांव**	**बाब निहाय कामे**	**सन २०१८-१९ करीता प्रस्तावित रक्कम रुपये**
१	मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे	भांबुर्डा (कोथरुड)	ग्लिरिसिडीया वृक्ष यंत्राचे सहाय्याने मुळासहित काढणे	१६,८९,६००/-
२		भांबुर्डा (पाषाण)	ग्लिरिसिडीया वृक्ष यंत्राचे सहाय्याने मुळासहित काढणे	५,०६,८८०/-
३		भांबुर्डा (पाचगाव पर्वत)	ग्लिरिसिडीया वृक्ष यंत्राचे सहाय्याने मुळासहित काढणे	१३,५१,६८०/-
४		पौंड (बावधन)	ग्लिरिसिडीया वृक्ष यंत्राचे सहाय्याने मुळासहित काढणे	४,७३,०८८/-
५		पुणे (वानवडी)	ग्लिरिसिडीया वृक्ष यंत्राचे सहाय्याने मुळासहित काढणे	१,६८,९६०/-
६		पुणे (कात्रज)	ग्लिरिसिडीया वृक्ष यंत्राचे सहाय्याने मुळासहित काढणे	६,७५,८४०/-
		वडगांव (तळेगांव)	ग्लिरिसिडीया वृक्ष यंत्राचे सहाय्याने मुळासहित काढणे	६,७५,८४०/-
	एकूण :-			**५५,४१,८८८/-**
	म्हणजे एकूण :-			**५५.४२ लक्ष**

उपरोक्त अनुदानाचा वापर करण्याच्या दृष्टीने (२४०६-०४८१) या लेखाशिर्षा अंतर्गत विहीत केलेल्या खालील अटी व शर्तींचे पालन करणे संबंधितावर बंधनकारक राहील.

१. सदर निधीसाठी नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर हे राहतील. त्यांच्याकडे हा निधी सुपूर्द करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत घ्यावयाच्या कामाची अंमलबजावणी कृती आराखडयाप्रमाणे, विहित कार्य्रपध्दतीनुसार आणि ठरविलेल्या मुदतीत करण्याबाबत दक्षता घ्यावी. याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना घ्याव्यात आणि अंमलबजावणीबाबत वेळोवेळी आढावा घ्यावा. मंजूर निधीपेक्षा जास्त खर्च होणार नाही याची नियंत्रक अधिकाऱ्यांनी दक्षता घ्यावी.
२. सदर तरतूद खर्च करतांना वित्त विभागाने वेळो वेळी घालून दिलेल्या अटी व शर्तीचे पालन करावे.

३. सदरहू निधी वितरित करण्यापूर्वी प्रस्तावानुसार योजनेतील निश्चित केलेल्या सर्व कामांना सक्षम अधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्राप्त आहे याची खात्री प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी करुन घ्यावी.

४. सदरहू कामे करतांना वन (संवर्धन) कायदा १९८० मधील तरतुदींचा भंग होणार नाही तसेच सर्वोच्च न्यायालय/उच्च न्यायालय/केंद्र शासनाच्या व्याघ्र संवर्धन प्राधिकरण यांनी दिलेल्या मार्गदर्शक सुचना/आदेशांची अवहेलना होणार नाही याची सुध्दा दक्षता घ्यावी.

५. उपरोक्त खर्च विहीत कार्यपध्दतीनुसार तसेच अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर उपलब्ध मासिक निधी प्रवाहानुसार खर्च करण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. सदरहू रक्कम खर्ची पडल्यानंतर त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

६. सर्व कामे दर्जेदार होतील याबाबत योग्य शासन कार्यप्रणालीचा वापर केला जाईल व कोणतीही अनियमितता होणार नाही याची सर्व जबाबदारी संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रा.) पुणे यांची राहील.

७. शासन निर्णय दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ नियम पुस्तिकेत नमुद केल्यानुसार तसेच उद्योग उर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ मध्ये नमूद गव्हर्नमेंट ई-मार्केटप्लेस (GeM) पोर्टलची कार्यपध्दती नुसार निविदा प्रक्रियेत खरेदी किंमत रु.तीन लाख व त्यापेक्षा अधिक असल्यास ई-निविदा प्रणालीचा वापर करावा.

८. प्रत्यक्ष खर्च करण्यापूर्वी विहीत पध्दतीचे पालन करावे व आवश्यकतेनुसार आहरण करावे.

९. प्रस्तावित कामांमध्ये निसर्गपूरक असलेले साहित्याचा जास्तीत जास्त वापर करावा.

१०. सदर खर्च वित्त विभागाच्या दिनांक ०२.०४.२०१८, २५.०१.२०१९, ३१.०१.२०१९ व ०८.०३.२०१९ च्या परिपत्रकातील व त्यासोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद केलेल्या अटीची पूर्तता होईल, याची दक्षता घेण्यात यावी.

११. शासन परिपत्रक क्र.वनबां-२०१९/प्र.क्र.२४/फ-९, दिनांक ३०.०१.२०१९ अन्वये वनविभागाकडून करण्यात येणाऱ्या कामाकरिता ई-निविदा प्रणालीचा वापर करणेबाबत दिलेल्या निर्देशाचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१२. सदर मंजूरीस शासन निर्णय क्रमांक एमएससी- २०११/प्र.क्र. १७८/फ-५, दिनांक ३०.९.२०११ च्या परिशिष्टात नमुद केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक असतील.

१३. वितरित केलेला निधी मंडळे / महामंडळे यांच्या वा इतर बँक खात्यात, स्वयप्रपंची लेख्यामध्ये अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ठेव अंशदान निधी मध्ये काढून ठेवता येणार नाही.

उपरोक्त खर्च मागणी क्रमांक सी-७, प्रधान शिर्ष २४०६, वनीकरणे व वन्यजीवन, (०१)(०४), शासकिय अभिकरणाकडून समुपयोजन (जळाऊ लाकूड व दगडी कोळसा) (२४०६-०४८१) या लेखाशिर्षाखाली सन २०१८-१९ करिता उपलब्ध होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०८.०३.२०१९ च्या परिपत्रकान्वये तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ मधील भाग पहिला, उपविभाग-३, परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२९१८०२२१८४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2019.03.30 16:35:16 +05'30'

(सुजय दोडल)
सह सचिव (वने))
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प,नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), पुणे
४. महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
५. वित्त विभाग, व्यय-१० कार्यासन, मंत्रालय, मुंबई-३२.
६. नियोजन विभाग (का-१४७५), मंत्रालय, मुंबई-३२.
७. फ-२/ब-१ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८. कार्यासन फ-९, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.(निवडनस्ती)